नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज


संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २०० Issue - 200 | वार बुधवार दि. १० डिसेंबर २०२५ Blow- Wednesday Date 10 December 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सोलापुरात दोन वेगवेगळ्या अपघातात चौघांचा मृत्यू

## नातू-आजोबा व नान्नज गावात दोन मित्रांचा जागीच मृत्यू








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. बार्शी सोलापूर मार्गावर भीषण अपघात झाला आहे. या अपघातात आजोबा आणि नातवाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. टिप्परने दुचाकीला धडक दिली आणि दुचाकीने पेट घेतला, यामध्ये दोघांचा मृत्यू झाला आहे. या या घटेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. आज दिवसभरात सोलापूर-बार्शी महामार्गावर दोन भीषण अपघात झाले. या दोन वेगवेगळ्या घटनात चौघांचा मृत्यू झाला आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, मानेगाव येथील दत्तात्रय पाखरे हे तब्येत बिघडलेल्या नातू शंभूला घेऊन वैरागजवळील दवाखान्यात आले होते. उपचारानंतर दोघे घरी परतत असताना छत्रपती कार केअरसमोर हा हादरवून सोडणारा अपघात घडला. या भीषण अपघातात दोन वर्षीय नातवाने आजोबाच्या कुशीतच प्राण सोडले आहे. अपघात इतका भीषण होता की, ज्या दुचाकी वाहनावर आजोबा आणि नातू जात होते त्या दुचाकीने पेट घेतला होता. नातू शंभू पाखरे (वय २ वर्षे) याचा जागीच मृत्यू झाला. तर भाजलेल्या अवस्थेत जखमी दत्तात्रय पाखरे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र दुर्दैवाने दत्तात्रय पाखरे यांचाही मृत्यू झाला आहे.

सोलापूर-बार्शी महामार्गावर दोन भीषण अपघात झाले आहेत. या दोन्ही वेगवेगळ्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला आहे. पहिली घटना सोलापूर बार्शी महामार्गवरील मानेगाव या ठिकाणी घडली असून या अपघतात दोन वर्षाच्या चिमकुल्यासह त्याच्या आजोबाचा मृत्यू झाला आहे. तर दुसरी घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज गावात घडली असून या अपघातामध्ये दोन मित्रांचा जागीच मृत्यू झाला आहे.

मानेगाव येथे झालेल्या अपघातमध्ये दत्तात्रय पाखरे हे आपल्या दोन वर्षाचा चिमुकला नातू शंभू पाखरे याला घेऊन दुचाकीवरुन जात होता. यावेळी भरधाव जात असलेल्या एका टिपर वाहनाने पाखरे याना जोरदार धडक दिली, ही धडक इतकी भयानक होती की दुचाकीला जागेवरच आग लागली. या अपघातात चिमुकल्या शंभूचा जागेवरच मृत्यू झाला तर गंभीर जखमी झालेल्या दत्तात्रय पाखरे यांना रुग्णालयात नेत असताना त्यांनी वाटेतच अखेरचा श्वास घेतला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार टिपर चालक नितीन काळे हा अपघातांनंतर जागेवरून पसार झाला होता मात्र नंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अटकेची कारवाई केली आहे. प्राथमिक माहितीनुसार आरोपी टिपर चालक नितीन काळे हा मोबाईल बघत गाडी चालवत होता, निष्काळजीपणाने गाडी चालवत त्याने पाखरे यांच्या गाडीसह अन्य दोन दुचाकीना देखील धडक दिली. ज्यामध्ये दोन ते तीन हे किरकोळ जखमी झाले आहेत, पाखरे कुटुंबातील आजोबा आणि नातवाचा मात्र दुर्दैवी मृत्यू झाला

**नान्नज गावात दोन मित्रांचा जागीच मृत्यू**

दुसरी घटना सोलापूर बार्शी महामार्गवरील उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज गावाजवळ घडली. यामध्ये एसटी महामंडळची बस आणि दुचाकीमध्ये झालेल्या धडकेत दोघां मित्रांचा जागीच मृत्यू झाला आहे. अतुल तिवारी आणि देवेंद्रसिंग बघेल असे अपघातात मृत्यू झालेल्या दोघां मित्रांची नावे आहेत. अतुल आणि देवेंद्रसिंग हे दोघेही मूळचे उत्तर प्रदेशचे रहिवासी असून मागील अनेक वर्षांपासून सोलापुरात केटरिंगचा व्यवसाय करतात. व्यवसायानिमित्ताने दोघेही बार्शी तालुक्यातील वैरागकडे जातं होते, याचवेळी बार्शीहून प्रवासी घेऊन निघालेल्या एसटीची दुचाकीला जोरदार धडक बसली. या अपघातांनंतर दोघां मित्रांचा जागीच मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह हे शवविच्छेदनासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयाकडे रवाना करण्यात आलेत.

## सिंधुदेशाच्या मागणीवरून वातावरण तापले, राजनाथ सिंहांच्या वक्तव्याची चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सिंधी संस्कृती दिनानिमित्त कराची येथे 'सिंधुदेश'च्या मागणीसाठी काढण्यात आलेल्या स्वातंत्र्य मोर्चामध्ये हजारो निदर्शकांनी 'पाकिस्तान मुर्दाबाद' आणि 'सिंधुदेश आझादी'च्या घोषणा दिल्या. जिये सिंध मुत्तहिदा महाज च्या नेतृत्वाखालील या मोर्चादरम्यान पोलिसांनी अचानक मार्ग बदलल्याने संतप्त जमावाने दगडफेक आणि तोडफोड सुरू केली. त्याला प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला. ज्यात पोलिस अधिकारी जखमी झाले. काही आंदोलनकर्त्यांना अटक करण्यात आली. दरम्यान, भारतीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे 'एक दिवस सिंध पुन्हा भारतात परत येईल' हे वक्तव्य सोशल मीडियावर आणि पाकिस्तानी माध्यमांमध्ये पुन्हा एकदा व्हायरल होत आहे. या आंदोलनाला अधिक बळ मिळाल्यास पाकिस्तानसाठी धोकादायक असू शकते अशी शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.




दरम्यान, रविवारी अधिकाऱ्यांनी रॅलीचा मार्ग बदलल्याने हजारो निदर्शकांमध्ये संतापाची लाट उसळली आणि तणाव वाढला. जमावातील काही जणांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर दगडफेक सुरू केली आणि तोडफोड केली, ज्यामुळे परिस्थिती आणखी चिघळली. पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी अश्रुधुराचा वापर केला. स्थानिक माध्यमांनुसार, या हिंसाचारात किमान ४५ लोकांना अटक करण्यात आली आहे.या हिंसाचारात पाच पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या आणि पोलीस वाहनांची तोडफोड करणाऱ्यांची ओळख पटवून त्यांना अटक करण्याचे निर्देश सरकारने पोलिसांना दिले आहेत.

भारतातही या मुद्द्याने लक्ष वेधून घेतले, जेव्हा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले की सिंध प्रांत एक दिवस पुन्हा भारतात परत येईल. गेल्या महिन्यात नवी दिल्ली येथे आयोजित सिंधी समाज संमेलनात राजनाथ सिंह म्हणाले होते की, त्यांच्या पिढीतील अनेक सिंधी हिंदूंनी १९४७ च्या निर्णयाला कधीही पूर्णपणे स्वीकारले नाही, ज्यामुळे सिंध पाकिस्तानचा भाग बनला. यावेळी त्यांनी जोर दिला की सिंध नेहमीच सांस्कृतिकदृष्ट्या भारताशी जोडलेला राहिला आहे.

राजनाथ सिंह म्हणाले की, आज जरी सिंध भारताचा भाग नसला तरी, संस्कृतीच्या दृष्टीने सिंध नेहमीच भारताचा भाग राहील.जिथे जमिनीचा प्रश्न आहे, तिथे सीमा बदलत राहतात. कोण जाणे, उद्या सिंध पुन्हा भारतात परत येईल.

## राज्यातील सर्व कारागृहांमध्ये उद्या आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मुंबई उच्च न्यायालयाअंतर्गत असलेल्या 'महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील सर्व कारागृहांमध्ये उद्या बुधवार १० डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसाचे औचित्य साधून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग' ही राज्यातील मानवी हक्कांबाबत कायदेशीर कारवाई करणारी संस्था आहे. १० डिसेंबर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा' (यूडीएचआर) स्वीकारला होता. म्हणूनच १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्कांबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी साजरा होतो. कैद्यांना त्यांच्या कारावासातील कालावधीत त्यांचे जीवन, समता, सन्मान आणि स्वातंत्र्याबद्दलचे कायदेशीर अधिकार कळावेत, याकरिता हा जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष मा. न्यायमूर्ती ए. एम. बदर यांच्या संकल्पनेतून, सदस्य मा. न्यायमूर्ती, स्वप्ना जोशी, संजय कुमार (भापोसे) यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील सर्व कारागृहांत 'कैद्यांचे मानवी हक्क आणि संरक्षण' या विषयी माहिती पुस्तिकेचे वाटप आणि मार्गदर्शन करून कायदेविषयक जागृती करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सचिव प्रदीपकुमार डांगे (भाप्रसे) आणि महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा या संस्थेचे अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक सुहास वारके (भापोसे) तसेच विजय केदार, निबंधक, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. बुधवारी सकाळी ११ वाजल्यापासून होणाऱ्या या कार्यक्रमात राज्यातील सर्व प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त, कारागृह प्रशासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत.

## बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी सरकार जंगलात १ कोटींच्या शेळ्या-बकऱ्या सोडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरात अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांमध्ये माणसांवर बिबट्यांचे हल्ले वाढल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आता महायुती सरकारकडून बिबट्यांनी (ङशेरीव रींरलज्ञ) खाण्याच्या शोधात जंगलाबाहेर (ऱ्रीशीीं) येऊ नये, यासाठी जंगलातच शेळ्या किंवा बकऱ्या (ऱ्रीीं) सोडण्याचा निर्णय घेतला आहे. अधिकृतरित्या या निर्णयावर मंजुरीची मोहोर उमटली नसली तरी पुण्यातील काही भागांमध्ये बिबट्यांना खाण्यासाठी शेळ्या किंवा बकऱ्या सोडण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्याचे वनमंत्री गणेश नाईक (ऱ्रपशीह छरळज्ञ) यांनी दिली. ते मंगळवारी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वाढत्या हल्ल्यांविषयी वनमंत्री गणेश नाईक यांना विचारणा करण्यात आली. यावर प्रतिक्रिया देताना गणेश नाईक यांनी म्हटले की, हिंस्त्र प्राण्यांना जे भक्ष्य पाहिजे ते भक्ष्य जंगलात उपलब्ध राहिलेले नाही.


## वर्ध्यातील ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश, १९२ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

वर्धा : वर्ध्यातील ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. वर्ध्यात असणाऱ्या ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश केला आहे. तब्बल १९२ कोटी रुपयांचे १२८ किलो मेफेड्रॉन जप्त करण्यात आले आहे. महसूल गुप्तवार्ता संचालनालयानं ही मोठी कारवाई केली आहे.

मेफेड्रॉनच्या साठ्यासह २४५ किलो रॉ-मटेरियल जप्त करण्यात आले आहे. वर्ध्याच्या कारंजा येथून ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश केल्याप्रकरणी तिघांना आली करण्यात आली आहे.

मेफेड्रॉनच्या साठ्यासह २४५ किलो रॉ-मटेरियल जप्त करण्यात आले आहे.

तब्बल १९२ कोटी रुपयांचे १२८ किलो मेफेड्रॉन जप्त करण्यात आले आहे. वर्ध्याच्या कारंजा येथून ड्रग्स फॅक्टरीचा पर्दाफाश करण्यात आला आहे.



### हार्दिक पंड्याची अर्धशतकीय वादळी खेळी

### जसप्रीत बुमराहचे ऐतिहासिक शतक!

# टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेला १०१ धावांनी लोळवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताने पहिल्या टी२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेला तब्बल १०१ धावांनी धुळ चारली. या सामन्यात जसप्रीत बुमराहने आपल्या टी२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील १०० विकेट्स पूर्ण करत ऐतिहासिक कामगिरी बजावली. कटकमध्ये झालेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत १७५ धावा केल्या, तर प्रत्युत्तर दक्षिण आफ्रिकेची संपूर्ण टीम केवळ ७४ धावांवर गारद झाली. यापूर्वी कटकच्या बाराबती स्टेडियमवर भारत कधीच दक्षिण आफ्रिकेला हरवू शकला नव्हता. येथे झालेल्या दोन्ही सामन्यांत आफ्रिकेनेच भारताला पराभव दिला होता. मात्र, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात टीम इंडियाने हा दुष्काळ संपवत आफ्रिकेला १०१ धावांच्या पराभवाचा चटका दिला.

टीम इंडियाची सुरुवात फारच निराशाजनक....

पहिल्या टी-२० सामन्यात टीम इंडियाची सुरुवात फारच निराशाजनक झाली. पॉवर-प्लेमध्ये भारताने अवघ्या ४० धावांत दोन महत्त्वाचे विकेट गमावले. शुभमन गिल फक्त ४ धावांवर, तर कर्णधार सूर्यकुमार यादव ११ धावांवर बाद झाला. त्यानंतर अभिषेक शर्मा देखील १७ धावां करू शकला. तिलक वर्मा याने ३२ चेंडूत २६ धावांची खेळी केली, तर अक्षर पटेल २३ धावा करून पॅव्हेलियनला परतला. शिवम दुबे ९ चेंडूत ११ धावा करून बाद झाला. भारतीय संघाकडून फक्त हार्दिक पांड्यानेच दमदार अर्धशतक झळकावले आणि त्याच्या जोरदार खेळीमुळे भारताने २० षटकांत १७५/६ धावा उभ्या केल्या.





हार्दिक पांड्याची तुफानी खेळी

लडखडलेल्या भारतीय डावाला आधार देण्याचे मोठे काम हार्दिक पांड्याने केले. अखेरपर्यंत टिकून राहणाऱ्या हार्दिकने दक्षिण आफ्रिकी गोलंदाजांना चांगलंच धारेवर धरलं. तुफानी फटकेबाजी करत २८ चेंडूत नाबाद ५९ धावा ठोकल्या. या खेळी दरम्यान त्याने बॅटमधून ६ चौकार आणि ४ षटकार मारले. त्याचा स्ट्राइकरेट तब्बल २१०.७१ इतका होता. याचदरम्यान हार्दिक पांड्याने टी-२० क्रिकेटमधील १०० षटकारांचा टप्पाही गाठला आणि भारताला सन्मानजनक स्कोरपर्यंत पोहोचवले.

अर्शदीप सिंगचा कहर, जसप्रीत बुमराहचं ऐतिहासिक शतक!

लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. पावरप्लेअखेर त्याच्या तीन विकेट्स पडल्या होत्या. त्यानंतरही आफ्रिकन फलंदाज नियमित अंतराने माघारी परतत गेले आणि एकाही खेळाडूला मोठी खेळी करता आली नाही. त्याच्या खराब फलंदाजीची झलक म्हणजे संपूर्ण संघातून केवळ चारच फलंदाज दहाच्या पुढे जाऊ शकले. दक्षिण आफ्रिकेकडून डेवाल्ड ब्रेविसने सर्वाधिक २२ धावा केल्या. तर कर्णधार एडेन मार्करम आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी प्रत्येकी १४, तसेच मार्को यान्सेनने १२ धावा योगदान दिले.

भारताकडून गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली. अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन-दोन विकेट्स घेतल्या. तर शिवम दुबे आणि हार्दिक पांड्या यांनी प्रत्येकी एक-एक विकेट मिळवली. विशेष म्हणजे भारताच्या सर्वच गोलंदाजांनी विकेट घेतली, ही सामन्याची खास बाब ठरली. याचदरम्यान जसप्रीत बुमराहने टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० विकेट्स पूर्ण करत ऐतिहासिक टप्पा गाठला. तो हा पराक्रम करणारा अर्शदीपनंतर भारताचा दुसरा गोलंदाज ठरला.

## संपादकीय....

### वादळी खेळी

भारताने पहिल्या टी२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेला तब्बल १०१ धावांनी धुळ चारली. या सामन्यात जसप्रीत बुमराहने आपल्या टी२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील १०० विकेट्स पूर्ण करत ऐतिहासिक कामगिरी बजावली. कटकमध्ये झालेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत १७५ धावा केल्या, तर प्रत्युत्तर दक्षिण आफ्रिकेची संपूर्ण टीम केवळ ७४ धावांवर गारद झाली. यापूर्वी कटकच्या बाराबती स्टेडियमवर भारत कधीच दक्षिण आफ्रिकेला हरवू शकला नव्हता. येथे झालेल्या दोन्ही सामन्यांत आफ्रिकेनेच भारताला पराभव दिला होता. मात्र, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात टीम इंडियाने हा दुष्काळ संपवत आफ्रिकेला १०१ धावांच्या पराभवाचा चटका दिला. पहिल्या टी-२० सामन्यात टीम इंडियाची सुरुवात फारच निराशाजनक झाली. पॉवर-प्लेमध्ये भारताने अवघ्या ४० धावांत दोन महत्त्वाचे विकेट गमावले. शुभमन गिल फक्त ४ धावांवर, तर कर्णधार सूर्यकुमार यादव ११ धावांवर बाद झाला. त्यानंतर अभिषेक शर्मा देखील १७ धावां करू शकला. तिलक वर्मा याने ३२ चेंडूत २६ धावांची खेळी केली, तर अक्षर पटेल २३ धावा करून पॅव्हेलियनला परतला. शिवम दुबे ९ चेंडूत ११ धावा करून बाद झाला. भारतीय संघाकडून फक्त हार्दिक पांड्यानेच दमदार अर्धशतक झळकावले आणि त्याच्या जोरदार खेळीमुळे भारताने २० षटकांत १७५/६ धावा उभ्या केल्या. लडखडलेल्या भारतीय डावाला आधार देण्याचे मोठे काम हार्दिक पांड्याने केले. अखेरपर्यंत टिकून राहणाऱ्या हार्दिकने दक्षिण आफ्रिकी गोलंदाजांना चांगलंच धारेवर धरलं. तुफानी फटकेबाजी करत २८ चेंडूत नाबाद ५९ धावा ठोकल्या. या खेळी दरम्यान त्याने बॅटमधून ६ चौकार आणि ४ षटकार मारले. त्याचा स्ट्राइकरेट तब्बल २१०.७१ इतका होता. याचदरम्यान हार्दिक पांड्याने टी-२० क्रिकेटमधील १०० षटकारांचा टप्पाही गाठला आणि भारताला सन्मानजनक स्कोरपर्यंत पोहोचवले. लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. पावरप्लेअखेर त्याच्या तीन विकेट्स पडल्या होत्या. त्यानंतरही आफ्रिकन फलंदाज नियमित अंतराने माघारी परतत गेले आणि एकाही खेळाडूला मोठी खेळी करता आली नाही. त्याच्या खराब फलंदाजीची झलक म्हणजे संपूर्ण संघातून केवळ चारच फलंदाज दहाच्या पुढे जाऊ शकले. दक्षिण आफ्रिकेकडून डेवाल्ड ब्रेविसने सर्वाधिक २२ धावा केल्या. तर कर्णधार एडेन मार्करम आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी प्रत्येकी १४, तसेच मार्को यान्सेनने १२ धावा योगदान दिले. भारताकडून गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली. अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन-दोन विकेट्स घेतल्या. तर शिवम दुबे आणि हार्दिक पांड्या यांनी प्रत्येकी एक-एक विकेट मिळवली. विशेष म्हणजे भारताच्या सर्वच गोलंदाजांनी विकेट घेतली, ही सामन्याची खास बाब ठरली. याचदरम्यान जसप्रीत बुमराहने टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० विकेट्स पूर्ण करत ऐतिहासिक टप्पा गाठला. तो हा पराक्रम करणारा अर्शदीपनंतर भारताचा दुसरा गोलंदाज ठरला.

# आमदार अभिजीत पाटील यांनी तुकडा बंदी कायद्यावर नागपूर अधिवेशनामध्ये उठवला आवाज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जमीन तुकडेबंदी कायदा (सुधारणा) विधेयक संदर्भात महत्त्वाचे मुद्दे मांडले..

गेल्या अधिवेशनातही ग्रामीण भागातील ग्रामपंचायत हद्दीत राहणाऱ्या नागरिकांना घरकुल बांधताना भेडसावणाऱ्या अडचणींबद्दल चर्चा झाली होती. त्यावेळी मंत्री महोदयांनी एस.ओ.पी. दाखल करून गावांतर्गत २०० मीटर, ५०० मीटर अशा मर्यादेत घरकुलांना परवानगी देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली होती. त्या निर्णयाचे अंमलीकरण आता नेमके कसे होणार, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर जुने गावठाण आणि नवीन वसलेली वस्त्या आहेत. या वस्त्यांमध्ये वर्षानुवर्षे लोक राहतात, पण त्यांच्या प्लॉट्सना गुंटेवारीसारखी अनियमित स्थिती आहे. रस्त्यालगतच्या घरांसह अशा नव्या वसाहतींनाही नियमित करून देणार आहात का?

जर नियमितीकरण झाले तर–

- नागरिकांना बँक कर्ज मिळेल,
- मालमत्ता मॉर्गेज करता येईल,
- स्वतंत्र ७/१२उतारा मिळेल,

अशी सुविधा मिळणे आवश्यक आहे.

यासोबतच सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे महसूल विभागातील प्रचलित भ्रष्टाचार. तलाठी आणि सर्कल अधिकाऱ्यांकडून नोंदीच्या बदल्यात २००० ते ५००० रुपये हप्ता घेतला जातो, तर ५–१० लाखांचे प्लॉट असताना १०% पर्यंत रक्कम मागितली जाते. अधिकाऱ्यांना आपण पगार देतो, पण नोंदीशिवाय पैसे न मिळाल्याशिवाय काम होत नाही, ही ग्रामीण जनतेची अत्यंत मोठी समस्या आहे.

या पार्श्वभूमीवर मंत्री महोदयांनी अधिकृतरीत्या कडक सूचना, नियंत्रण व्यवस्था आणि स्पष्ट नियमावली जाहीर करणे अत्यावश्यक आहे.

हे विधेयक निश्चितच ग्रामीण भागातील हजारो नागरिकांच्या अडचणी दूर करणारे आहे. तरीही

- ते ग्रामीण भागाला संपूर्णपणे लागू होणार का?
- वस्त्या, वाड्या, नवीन वसाहती यांचा यात स्पष्ट आणि कायमस्वरूपी समावेश होणार का? या बाबतही ठोस उत्तर मिळावे. अशी मागणी आमदार अभिजीत पाटील यांनी केली.

# कोणासाठी चालले आहेत हे सगळे वाद?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देशात वादांना आता थांबाच उरलेला नाही. एक वाद संपतो न संपतो तोच दुसरा उभा राहतो. कधी धर्माच्या नावावर, कधी जातीच्या, कधी भाषेच्या, तर कधी राष्ट्रभक्तीच्या प्रमाणपत्रावर. टीव्हीवरील चर्चा, सोशल मीडियावरील युद्ध, राजकीय व्यासपीठांवरील आरडाओरडा आणि रस्त्यावर उतरणारी गर्दी–या सगळ्यांतून एकच प्रश्न सतत डोकावत राहतो, हे सगळे वाद नेमके कोणासाठी चालले आहेत? सामान्य माणसासाठी की सत्तेच्या आसनांसाठी?


सामान्य नागरिक आज अक्षरशः थकला आहे. महागाईने कंबर मोडली आहे, रोजगार अस्थिर झाला आहे, शिक्षण महाग होत चालले आहे, आरोग्य सेवांवरील विश्वास डळमळीत झाला आहे. पण या सगळ्या प्रश्नांवर देश पेटून उठताना दिसत नाही. उलट एखाद्या विधानावर, एका पोस्टवर, एका घोषणावर संपूर्ण देश दोन गटांत विभागला जातो. प्रश्न असा उरतो की आपण आपल्या प्रश्नांवर लढतो आहोत की आपल्यावर लादलेल्या मुद्द्यांवर?

धर्म हा माणसाचा आधार असतो; पण आज तो सत्तेचे साधन बनला आहे. श्रद्धा ही अंतःकरणातील गोष्ट असते; पण आज ती आरडाओरडीत मोजली जाते. राष्ट्र हे सर्वांचे असते; पण आज राष्ट्रप्रेमाची मक्तेदारी काही ठरावीक लोकांकडे गेली आहे. जो वेगळा विचार करतो, तो संशयास्पद ठरवला जातो; जो प्रश्न विचारतो, तो देशद्रोही ठरतो; आणि जो गप्प बसतो, तो सुरक्षित राहतो–ही आपल्या काळाची शोकांतिका आहे.

प्रशासन लोकांसाठी असते, शासन लोकहितासाठी असते आणि राजकारण जनतेच्या प्रश्नांसाठी असायला हवे. पण प्रत्यक्षात चित्र नेमके उलटे दिसते. आज लोक प्रशासनासाठी नाहीत, तर प्रशासन लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आहे; शासन जनतेसाठी नाही, तर सत्ताधाऱ्यांच्या स्थैर्यासाठी आहे; आणि राजकारण लोकसेवेसाठी नाही, तर केवळ निवडणुकांसाठी आहे. मग या वादांतून सामान्य माणसाला नेमके काय मिळते? काहीही नाही–फक्त तणाव, भीती आणि समाजाचे विभाजन.

आजचा सामान्य नागरिक दोन आघाड्यांवर लढतो आहे. एकीकडे जीवनाचा संघर्ष–घर, नोकरी, मुलांचे शिक्षण, आजारपण, कर्ज आणि दुसरीकडे विचारांचा संघर्ष–मी कुठल्या गटात बसतो, माझे मत कोणत्या बाजूला आहे, बोललो तर कोण दुखावेल? हा दुहेरी ताण माणसाला आतून पोखरत चालला आहे. पण जे निर्णय घेतात, जे वाद पेटवतात, जे घोषणा देतात–त्यांच्या आयुष्यात मात्र सुविधा, सुरक्षा आणि सत्तेचे कवच कायम आहे.

मग प्रश्न उरतो–हे सगळे वाद खरंच धर्मासाठी आहेत का? देशासाठी आहेत का? की ते फक्त सत्तेच्या खुर्चीसाठी आहेत? इतिहास सांगतो, की जेव्हा जेव्हा लोकांचे खरे प्रश्न बाजूला ठेवायचे असतात, तेव्हा तेव्हा भावनिक मुद्दे पुढे केले जातात. कारण भूक विचार करायला लावते, पण भावनांचा भडका विचार करायला थांबवतो.



लोकशाहीचा आत्मा म्हणजे प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य. पण आज हे स्वातंत्र्य हळूहळू संशयाच्या कठड्यावर नेले जात आहे. प्रश्न विचारणे म्हणजे विरोध समजले जाते, आणि विरोध म्हणजे देशविरोध ठरवला जातो. अशा वातावरणात सत्य लवकरच गुदमरू लागते आणि अफवाच वास्तव बनू लागतात.

तरीही आजचा सामान्य माणूस पूर्णपणे पराभूत झालेला नाही. तो थकलेला आहे, नाराज आहे, भ्रमनिरासलेला आहे–पण अजूनही जागा आहे. तो प्रश्न विचारतो आहे, मनातच का असेना, पण विचारतो आहे. माझे आयुष्य का अधिक कठीण होत चालले आहे? माझ्या प्रश्नांवर कोणी बोलत का नाही? मी दरवेळी दुसऱ्याच मुद्द्यांसाठी का रस्त्यावर उतरतो? हे प्रश्न जेव्हा मोठ्या आवाजात समाज विचारू लागेल, तेव्हा हे सगळे कृत्रिम वाद आपोआप पोकळ ठरतील.

कारण शेवटी एक साधे सत्य आहे–देश वादांनी नाही, तर विवेकाने चालतो. समाज द्वेषाने नाही, तर समजुतीने टिकतो. आणि लोकशाही घोषणांनी नाही, तर प्रश्नांनी जिवंत राहते.

म्हणूनच आज प्रश्न इतकाच आहे–हे सगळे वाद कोणासाठी चालले आहेत? आणि त्याहूनही महत्त्वाचा प्रश्न असा आहे–आपण अजून किती काळ ते न बोलता सहन करणार आहोत?

**– डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# मराठवाड्यातील महत्त्वाच्या जिल्ह्यात म्हाडाची ५००० घरांची लॉटरी, सर्वसामान्यांच्या स्वप्नातील घर सत्यात उतरणार






छत्रपती संभाजीनगर : शहराचा वाढता विस्तार व घरांची वाढती मागणी लक्षात घेऊन छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने (म्हाडा) आगामी पाच वर्षांचा आराखडा तयार करून रास्त दरांत दर्जेदार पाच हजार घरे बांधण्याचे निश्चित केले आहे.

जनसामान्यांना रास्त दरांत दर्जेदार घरांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने म्हाडा (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ) ही गृहनिर्माण सुविधा देणारी यंत्रणा पाच डिसेंबर १९७७ रोजी स्थापन केली. छत्रपती संभाजीनगर म्हाडा मंडळाच्या कार्यक्षेत्रात मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचा समावेश आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट; तसेच मध्यम व उच्च उत्पन्न गट या उत्पन्नांवर आधारित सार्वजनिक गृहनिर्माण योजनेंतर्गत परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे 'म्हाडा'चे ध्येय आहे.

दरम्यान, पर्यटननगरी व मराठवाड्यातील सर्वांत मोठे महानगर असलेले छत्रपती संभाजीनगर गेल्या काही वर्षांत झपाट्याने विस्तारत आहे. पर्यटन उद्योगाबरोबरच शेंद्रा, वाळूज, डीएमआयसी या औद्योगिक वसाहती, येथील नामांकित कंपन्या व होणारी मोठी गुंतवणूक या कारणांनी रोजगारांच्या संधी वाढल्या आहेत; तसेच विविध शैक्षणिक संस्था, आरोग्य सुविधा आदी कारणांमुळे शहराच्या चारही बाजूंनी नागरी वसाहत वाढत आहे. घरांना होणारी मोठी मागणी लक्षात घेऊन म्हाडानेदेखील परवडणारी घरे अधिक बांधण्यावर भर दिल्याचे चित्र आहे.

त्याचाच भाग म्हणून, पंतप्रधान घरकुल योजनेंतर्गत (पीएमएवाय) नक्षत्रवाडी येथील गट नंबर नऊमध्ये ६.४ हेक्टरवर म्हाडाने एक हजार ५६ सदनिका उभारणीचा गृहप्रकल्प हाती घेतला असून, या घरांची सोडत नुकतीच काढण्यात आली. यासह २० टक्के सर्वसमावेशक योजनेंतर्गत २१ सदनिका, १८ भूखंड; तसेच चिकलठाणा परिसरात १५४ सदनिकांसाठी सोडत करण्यात आली. ७५९ घरे अद्यापही उपलब्ध असून, त्यासाठी लवकरच सोडत काढली जाईल.

घरांसाठी मिळणारा प्रतिसाद पाहता पुढील पाच वर्षांत पाच हजार घरे उभारण्याचे नियोजन म्हाडाने हाती घेतल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रेय नवले यांनी सांगितले.

नक्षत्रवाडी परिसरातील म्हाडाची १०.५६ हेक्टर जमीन आहे. यासह नक्षत्रवाडी परिसरातील सर्व्हे क्रमांक नऊमध्ये ५.२ हेक्टर; तसेच लगतच दोन हेक्टर जमीन असून, गारखेडा परिसरात सुमारे अर्धा एकर जागा उपलब्ध आहे. देवळाई परिसरातही दहा हेक्टर जागा म्हाडाच्या मालकीची असून, या जागांवर टप्प्याटप्प्याने दर्जेदार व परवडणारी घरे उभारण्यात येतील, अशी माहिती कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेगव्हाणकर यांनी सांगितले.

# महिला सक्षमीकरणाबाबतीत कोणतीही तडजोड नाही : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

नागपूर : राज्यात मुले तसेच महिलांच्या सुरक्षेसह त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. गेल्या काळात अनेक नवीन योजना, उपक्रम आम्ही सुरु केले. राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी जे काही करणे आवश्यक आहे ते सर्व करु, याबाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

राज्य महिला आयोगाच्या वतीने वनामती येथे महिलांसाठी 'सक्षमा' या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार मनिषा कायंदे, आमदार चित्रा वाघ, आमदार विक्रम काळे, आमदार मंजूळा गावित, आमदार सना मलिक, आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवळे, आयोगाच्या माजी सदस्य निता ठाकरे आदी उपस्थित होते.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने कठोर कायदे केले आहेत, या कायद्यांच्या जनजागृतीची गरज आहे. अत्याचाराची अनेक प्रकरणे अजूनही आपण पाहतो. एकीकडे महिलांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न होत असतानाच काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहे. त्यामुळे केवळ कायदे करुन चालणार नाही तर समाजात जनजागृती निर्माण करणे देखील तितकेच महत्वाचे आहे. महिला आयोगाच्या 'सक्षमा'सारखे जनजागृतीचे कार्यक्रम राज्यात ठिकठिकाणी झाले पाहिजे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

समाजाची प्रतिष्ठा महिलांच्या सुरक्षेवर अवलंबून असते. महिला सुरक्षित नसतील तर समाज सक्षम होणार नाही. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात महिला सुरक्षाविषयक बाबींमध्ये अनेक आमुलाग्र बदल केले. कालबाह्य कायदे रद्द करुन नवीन कायदे आणले आहेत. हे कायदे महिलांसाठी कवच कुंडले आहेत. या कायद्यातील तरतुदींची माहिती महिला आयोगामार्फत जनजागृतीच्या माध्यमातून महिलांपर्यंत पोहचवावी, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्य शासनाने गेल्या काळात महिलांसाठी भरीव काम केले. मुलींना उच्च शिक्षण विनामूल्य देण्याचा निर्णय घेतला. बस प्रवासात ५० टक्के सवलत, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य, लखपती दीदी सारखे उपक्रम राबविले. महिलांच्या कल्याणासाठी राज्य शासन महिला आयोगाच्या मागे सक्षमपणे उभे आहे. आयोगाने अधिक सक्षमपणे काम करावे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर म्हणाले की, आपल्या समाजात महिलांना सर्वोच्च स्थान आहे, असे असताना महिला असुरक्षित असल्याची कल्पना देखील दु:खदायक वाटते. केंद्र आणि राज्य शासनाने महिलांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. भारतीय न्याय संहितेद्वारे महिलांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहे. हे कायदे व त्यातील तरतुदी महिलांपर्यंत पोहचल्या पाहिजे. महिला आयोगाच्या 'सक्षमा' कार्यक्रमातून या तरतुदी महिलांपर्यंत पोहचेल, असा विश्वास व्यक्त केला.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य महिला आयोगाचे होत असलेले काम कौतुकास्पद आहे. महिलासांठी नवनवीन कायदे व चांगल्या तरतुदी शासनाने केल्या आहेत. त्याची जनजागृती होणे गरजेचे आहे. सक्षमा या कार्यक्रमाच्या माध्यमातून पिडीत महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न होतील. महिलांना आपले अधिकार व असलेल्या कायद्यांची माहिती असली पाहिजे.



महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, आपल्या समाजात महिलांना मानसन्मान, प्रतिष्ठा दिल्या जाते. परंतु वाईट प्रवृत्तीच्या काही लोकांमुळे महिला सुरक्षेबाबत बोलावे लागते. महिला सुरक्षा व सक्षमीकरणासाठी अनेक योजना केंद्र व राज्य शासनाने आणल्या. समाजाने देखील महिलांसाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले पाहिजे. आमदार चित्रा वाघ यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी 'सक्षमा' या कार्यक्रमामागची भूमिका विषद केली. महिला सुरक्षेसाठी भारतीय न्याय संहितेत करण्यात आलेले बदल, महिला विषयक कायदे व सायबर सुरक्षेबाबत महिलांमध्ये जनजागृती घडविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. न्याय संहितेतील तरतुदी महिला सुरक्षेसाठी अतिशय उपयुक्त असून महिलांनी त्याचा वापर केला पाहिजे. बालविवाह, हुंडाबळी यासारख्या विविध बाबींवर चळवळ स्वरुपात आयोगाच्यावतीने काम केले जात आहे. गेल्या वर्षभरात आयोगाने महिला संरक्षण व अत्याचाराविरोधात प्रखर भूमिका घेतली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी, महिला कर्मचारी, विविध समाजिक संघटनांच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दुसऱ्या सत्रात तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे भारतीय न्याय संहितेतील बदल, महिला कायदे व सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निफाड तालुक्यात महसूल विभागाचा धडाका; तीन ठिकाणी विनापरवाना गौणखनिज वाहतूक करणारी वाहने जप्त

## सलग सात कारवायांमुळे अवैध वाहतूक करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक - छत्रपती संभाजीनगर मार्गासह चांदोरी, कसबे सुकेणे व सायखेडा परिसरात महसूल विभागाने सलग तीन कारवायांमध्ये विनापरवाना गौणखनिज वाहतूक करणारे डंपर व हायवा जप्त केले. दोन दिवसांत झालेल्या या कारवायांमुळे अवैध वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहेत.

निफाडचे तहसिलदार मा.विशाल नाईकवाडे यांचे नेतृत्वाखाली मंडळ अधिकारी रूपाली सावळे, मंडळ अधिकारी जयंत लिलके, तलाठी कैलास शांताराम आहिरे, ग्राममहसूल अधिकारी अबोली प्रदीप साळवे, रोशनी पटेल, पूर्वा राठोड तलाठी वर्हेदारणा यांचे पथकाने ही कारवाई केली. या कारवाईत दिनांक ७ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास चांदोरी - कसबे सुकेणे रस्त्यावरील माऊली ढाब्याजवळ एम.एच १५ जे.डब्ल्यू ७७०१ क्रमांकाच्या डंपरमधून १ ब्रास कच अंदाजे किंमत ३२५० रु.विनापरवाना वाहतूक होत असल्याचे आढळले. चालक किरण दिलीप लांडगे, रा.कसबे सुकेणे याने कच कोठून आणला आणि मालक कोण याबाबत समाधानकारक माहिती दिली नाही. याच दिवशी दुपारी साडेबारा वाजता सायखेडा परिसरातील हरे राम पेट्रोल पंपाजवळ अमोल बाळू फड, रा.महाजनपूर व विशाल धोंडीराम कापसे, रा.भेंडाळी हे दोघे मिळून नंबर प्लेट नसलेल्या हायवा मधून ६ ब्रास अवैध गौणखनिज (किंमत अंदाजे रु. ३६ हजार) वाहतूक करताना आढळून आले.

दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी अकराच्या सुमारास चांदोरी चौफुली येथे महसूल पथकाने एम.एच १५ जे.डब्ल्यू ०७०१ हा डंपर अडवून तपासणी केली. या डंपरमध्ये १ ब्रास वॉशसॅन्ड कच, अंदाजे किंमत ३,२५० रु.विनापरवाना वाहतूक होत असल्याचे आढळून आले. चालक अर्जुन रमेश जाधव, रा.सरदवाडी, ता.सिन्नर याच्याकडे परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे सदर वाहनांचे पंचनामे करून सायखेडा पोलिस ठाण्यात जमा करण्यात आले असून संबंधित आरोपींच्या विरोधात भा.न्या.स २०२३ कलम ३०३(२) मो. वा.का कलम ३९/१९२ (१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध खनिज वाहतूकदारांवर कडक कारवाई सुरूच राहणार असल्याची माहिती निफाडचे तहसिलदार मा.विशाल नाईकवाडे



यांनी दिली आहे. एका सप्ताहात तब्बल सात सलग कारवायांमुळे अवैध वाहतूक करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पंढरपूर सांगोला रोडवरील, अपघाताचा काळा ठिपका हटणार, आठदिवसात गतिरोधक व रिफ्लेक्टर व दिग्दर्शक फलक लागणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील पंढरपूर सांगोला रोड वरील पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालय कडे जाणारा तसेच विक्रम हॉटेल समोरून नॅशनल हायवे ९६५ सी वरील रस्ता सतत अपघाताचा साक्षीदार ठरत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र चिं-तेचे वातावरण निर्माण झाले होते व या ठिकाणी वारंवार होणाऱ्या अपघातात दुर्दैवी घटना घडत होत्या.

या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी अँड बादल यादव यांनी आपल्या सहकार्यांचा १७ नंबर २०२५ रोजी राष्ट्रीय महामार्ग विभाग सोलापूर येथील माननीय कार्यकारी अभियंता यांच्याकडे लेखी विनंती अर्ज सादर केला, त्यांनी महोदयांनी मोबाईल वरून संपर्क साधून या अपघात प्रमाण ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

घेत कार्यकारी अभियंतांनी सकारमग प्रतिसाद येथे आठ दिवसात संबंधित ठिकाणी गतिरोधक बसवणे रिफ्लेक्टर लावणे रस्ता रंग रोंगोटी व कलर पेंटिंग करणे तसेच दिशादर्शक फलक उभारणे आश्वासन दिले आहे या निर्णयामुळे नागरिकांना समाधान व्यक्त केले असून अपघाताची मालिका थांबेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग विभागाने उचललेले पाऊल स्वागत आहे असले की प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांना उमटत आहे.

## ग्रामपंचायत कार्यालय वडाळी येथील भ्रष्टाचारची पोलखोल, उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**वडाळी मध्ये भ्रष्टाचारचे सावट', सचिव नागरे अडचणीत, चौकशी शिवाय सुट्टी नाही.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा : तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय वडाळी मधील प्रचंड आर्थिक गैरव्यवहार ग्रामनिधीचा दुरुपयोग,आणि संशयस्पद पद्धतीने सरकारी निधीचा दुरुपयोग केल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत सचिव , जगन्नाथ नागरे यांच्या विरोधात समोर आले आहेत या बाबत सौ. विद्या कापसे यांनी दि. २७/११/२५ रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती सिंदखेड राजा यांच्या कडे रीतसर तक्रार केली होती तक्रारीत केलेले आरोप एक दोन नव्हे तर थेट विकास निधीतील मोठ्या आर्थिक अनियमितेकडे बोट दाखविणारे आहेत त्या पैकी काही



मुख्य मुद्दे,१५वा वित्तआयोग निधी, दलित विकास रस्ते, नरेगा, जलजीवन विकास योजना, आरो प्लांट्स, तसेच बोगस बनावट झालेले घरकुल, तसेच अंगणवाडी अंतर्गत खर्च, असे विविध विकास कामा मध्ये खूप मोठा भ्रष्टाचार झाला असल्याण्याने आता मात्र चौकशी दरम्यान ग्रामविकास अधिकारी ना-गरे मात्र खूप मोठ्या अडचणीत सापडले आहेत तसेच आज तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी श्री, गजानन घुगे, ग्रामसेवक, नागरे,व मेहेत्रे मॅडम इंजिनियर पवार यांनी घटनास्थळी येऊन भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून था-तूर मातुर चौकशी करून संबंधित अधिकारी यांची पाठराखण करून भ्रस्टाचारस खतपाणी देण्याचे काम केले असून घटना स्थळावरून पलायन केले असल्याने वडाळी गावातील नागरिकांन मध्ये सुद्धा खूप मोठा न्यायकार्य प्रणाली वरती रोष निर्माण होत आहे दरम्यान तक्रार कर्त्या, विद्या कापसे याची उच्चं स्तरीय चौकशी ची मागणी केलेली असून तात्काळ दोषी अधिकाऱ्यांना वरती तात्काळ फौंजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली असून मला न्याय मिळावा व मला न्याय न मिळाल्यास परत माझे पुढील उपोषण न्याय मिळे पर्यंत सुरु असणार असल्याची माहिती दिली.

## परभणीत टाटा टेक्नॉलॉजीचे सीआयआयआयटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई :- परभणी जिल्ह्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान विकासाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल उचलले गेले असून सेंटर फॉर इन्व्हेशन, इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड ट्रेनिंग (सीआयआयआयटी) प्रकल्पाला आता प्रत्यक्ष स्वरूप मिळणार आहे. ₹११५ कोटी खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची राज्य मंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे मंजुरी शक्य झाली आहे.

या अत्याधुनिक सीआयआयआयटी केंद्रातून दरवर्षी ३,००० विद्यार्थ्यांना इंडस्ट्री ४.० युगातील प्रगत तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळणार आहे. त्यामुळे परभणी जिल्हा कौशल्य विकासाच्या नकाशावर ठळकपणे झळकणार असून येथील तरुणांची रोजगारक्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. ग्रामीण भागातील तरुणांना शहरांकडे स्थलांतर न करता आपल्या जिल्ह्यातच उच्च दर्जाचे तांत्रिक प्रशिक्षण, रोजगार आणि उद्योगसंधी उपलब्ध व्हाव्यात, हा मेघना बोर्डीकर यांच्या दूरदर्शी विचार या प्रकल्पातून स्पष्ट दिसतो. आयटी आणि स्टार्टअप क्षेत्राचे नवे केंद्र म्हणून परभणीची ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. सेलू परिसरात सॉफ्टवेअर कंपन्यांना आमंत्रित करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातूनच आयटी क्षेत्रात करिअर करण्याचा मार्ग खुला केला आहे.

तरुणांनी नोकरी शोधण-ारे न राहता नोकरी निर्माण करणारे व्हावे, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्टार्टअप मिशन अंतर्गत नवउद्योजकांसाठी मार्गदर्शन, मेंटॉरशिप आणि गरजेचे पाठबळ उपलब्ध करून देणारे उपक्रम राबवले जात आहेत. मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या सर्वांगीण विकासदृष्टीतील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे महिला सक्षमीकरण. ग्रामीण महिला बचत गटांना जोडून 'लखपती दीदी' संकल्पनेनुसार कौशल्य प्रशिक्षण, लघुउद्योगांसाठी मार्गदर्शन तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे महिलांचे उत्पन्न, आत्मविश्वास आणि स्वावलंबन मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पाणी, शेती, शिक्षण, आरोग्य अशा पारंपरिक विकास क्षेत्रांना कौशल्य, आयटी, स्टार्टअप आणि महिला उद्योजकता यांची सांगड घालून परभणीच्या दीर्घकालीन विकासाचा रोडमॅप मंत्री मेघना बोर्डीकर यांनी प्रभावीपणे रेखाटला आहे. या महत्त्वपूर्ण सीआयआयआयटी प्रकल्पाला मंजुरी मिळवून देण्यासाठी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, रजिस्ट्रार वेणीकर तसेच परभणी अॅस्ट्रॉनोमिकल सोसायटी यांचेही मोलाचे योगदान लाभले आहे.

या सर्व उपक्रमांच्या एकत्रित परिणामस्वरूप कौशल्यशाली, आत्मनिर्भर आणि प्रगत परभणी हे मेघना बोर्डीकर यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरू लागले आहे.

## प. स. माजी सदस्य चरमळ यांना मातृशोक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कोपरगाव पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तमराव चळवळ यांच्या मात-ोश्री गभा इंदुबाई रायभान चरमळ यांचे सोमवारी सायंकाळी निधन झाले असून मृत्यू समयी त्या ७५ वर्षाच्या होत्या मंगळव-ारी सकाळी दहा वाजता पढेगाव येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय धार्मिक सामाजिक,शैक्षणिक विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पढेगाव येथील शेतकरी कुटुंबात अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संसाराचा गाडा हाकून कै.इंदुबाई यांनी मुलांचा सांभाळ केला, मुलांना उच्च शिक्षित केले आपल्या मनमिळाऊ स्वभावाने त्यांनी पढेगाव परिसरात एक यशस्वी गृहिणी म्हणून नावलौकिक मिळविला



,त्यांच्या मागे संजीवनी साखर कारखान्याचे माजी अकौटंट बाबासाहेब चरमळ, संजीवनी कारखान्याचे माजी शेतकी ओव्हरसीयर व सटाणा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक, गणेश नगर सहकारी कारखान्याचे शेतकी अधिकारी वसंतराव चरमळ, कोपरगाव पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तम राव चरमळ, बाबासाहेब चरमळ व ज्ञानदेव चरमळ, ही पाच मुले, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे, अंत्यविधी प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य केशवराव भवर, गोदावरी खोरे दूध संघाचे माजी संचालक गोरखनाथ शिंदे, कोपरगाव बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहम,संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिन कोल्हे, गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, आमदार अशितोष काळे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे आदींनी यावेळी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**शिक्षक मतदार नोंदणी अभियानास भरघोस प्रतिसाद**

## पुणे विभागीय शिक्षक मतदार नोंदणीमध्ये डॉ. बी. पी. रोंगे सर अग्रेसर!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुणे विभागातील शिक्षक मतदार नोंदणी मोहिमेला भरघोस प्रतिसाद मिळत असून पुणे विभागांतर्गत येणाऱ्या पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यात सुरु असलेल्या शिक्षक मतदार नोंदणी उपक्रमात श्री विठ्ठल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूरचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे सरांची प्रभावी आणि पुढाकार घेणारी नेतृत्व भूमिका विशेषत्वाने अधोरेखित होत आहे. शिक्षण आणि शिक्षकांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी गेली अनेक वर्षे कार्यरत असलेले डॉ. रोंगे यांनी या मोहिमेच्या प्रारंभापासूनच मतदार नोंदणी ही केवळ प्रक्रिया नसून शिक्षकांच्या लोकशाही सहभागाचा महत्त्वपूर्ण भाग आहे, हे स्पष्ट केले आहे.

मतदार नोंदणीची गती वाढवण्यासाठी डॉ. रोंगे यांनी पुणे विभागातील शाळा, महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था, डी. एड./बी. एड. महाविद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये अशा विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन शिक्षकांशी तसेच निवृत्त शिक्षकांशी संवाद साधला. या संवादादरम्यान त्यांनी नोंदणीची आवश्यकता, नियम, आवश्यक कागदपत्रे आणि वेळापत्रक याबाबत सविस्तर माहिती दिल्याने शिक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण झाली. या व्यापक नोंदणी मोहिमेमुळे पुणे विभागातील शिक्षकांचा लोकतांत्रिक सहभाग वाढून त्यांचे प्रतिनिधित्व अधिक प्रभावी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिक्षकांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी आणि धोरणांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी मतदार नोंदणी अत्यंत महत्त्वाची ठरते, याकडे डॉ. रोंगे यांनी वारंवार लक्ष वेधले आहे. शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापक, मुख्याध्यापक, प्राध्यापक तसेच विविध शिक्षक संघटनांनी या उपक्रमाचे आणि डॉ. रोंगे यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले आहे. शिक्षकांनी एकजुटीने सहभागी होऊन लोकशाही प्रक्रियेला बळ दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

**जिल्हानिहाय शिक्षक मतदार नोंदणीचे तपशील खालीलप्रमाणे:**

१. पुणे- १३७३५

२. सोलापूर- ११३३७

३. सांगली- ७०५५

४. कोल्हापूर-



९७९८

५. सातारा- ७२८१

डॉ. बी.पी.रोंगे सर यांच्या टीमच्या माध्यमातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सुमारे ५०,००० शिक्षकांच्या मतदार नोंदणीस हातभार लागला आहे. पुणे विभागातील शिक्षक मतदार नोंदणीला मिळालेला हा अभूतपूर्व प्रतिसाद आणि डॉ. बी. पी. रोंगे सरांचे नेतृत्व पुढील निवडणुकांमध्ये शिक्षकांचा आवाज अधिक प्रभावीपणे उमटवेल, असा विश्वास शिक्षण क्षेत्रात व्यक्त होत आहे.

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांची 'माफसू' आणि कृषी महाविद्यालयाला भेट



नागपूर : राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयाला आज भेट देऊन पाहणी केली.

सेमिनरी हिल्स येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाला भेट दिली. तसेच विद्यापीठातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेतली. विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या संशोधन तसेच अत्याधुनिक प्रयोगशाळा आदींची पाहणी केली. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील तसेच विभागप्रमुख उपस्थित होते. 'माफसू' अंतर्गत येत असलेल्या पशु पैदास प्रक्षेत्राला त्यांनी भेट दिली. यावेळी गोवंश संवर्धन विशेषतः देशी गायींच्या संवर्धनाच्या सूचना त्यांनी केल्या.

महाराज बागेजवळील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयाला भेट दिली व चर्चा केली. कृषी महाविद्यालयातर्फे कृषी विषयक राबविण्यात येत असलेल्या संशोधन प्रकल्पाची तसेच संशोधित केलेले संशोधन शेतकऱ्यांपर्यंत कसे पोहोचवता येईल याची माहिती घेतली. नैसर्गिक शेतीला प्राधान्य देत अधिक उत्पादन देणाऱ्या संशोधित वाणांचा अवलंब करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी राज्यपालांनी कृषी विद्यापीठांच्या प्राध्यापकांसोबत संवाद साधला. कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश कडू यांनी विविध विभागांची माहिती दिली.

# सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांची अवैध व्यवसायावर सुगंधी सुपारी मावावर मोठी कारवाई

## कारवाई करून ६ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज रोजी ०८/१३/२०२५ श्री प्रशांत डगळे सो. सहाय्यक पोलीस निरीक्षक (भा.पो. से.) पंढरपूर उपविभागीय, पंढरपूर यांना मिळालेल्या बातम्यानुसार अनिल नगर, पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणात वैद्य सुपारी सुगंधी मावा बनवण्याचा व्यवसाय चालू असल्याची तसेच लाल रंगाची स्विफ्ट कार मध्ये मोठ्या प्रमाणात मावा असल्याची मिळाले. बातमीप्रमाणे छापा कारवाई केली आहे. सदर छापा कारवाईत इसम नामे.

१) विजय शिवाजी बामणे, राहणार महावीर नगर पंढरपूर, जिल्हा सोलापूर

२) गणेश दत्तात्रय बागल, राहणार आणि नगर पंढरपूर जिल्हा सोलापूर.

३) इस धनाजी पोरे राहणार अली नगर पंढरपूर जिल्हा सोलापूर.

४) शंकर वसंत कुदुरकर, राहणार अनिल नगर, पंढरपूर जिल्हा सोलापूर.

५) राहुल कल्याण मोठे, राहणार शेल्टर नाका तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर.

६) सुरज मिलन सिंग राजपूत राहणार पंढरपूर सुरज मिरजिंग रजपुत राहणार पंढरपूर यांच्या मालकीच्या जागेत आणि नगर पंढरपूर येथे ३१ किलो सुखा मावा किंमत ३१ हजार रुपये, ०३ तीन किलो ओला मावा किंमत ३०००/रुपये तसेच श्वेता हर्षित राठी राहणार पुणे यांच्या नावे आरसी बुक असलेली किंमत ६००,०००/ ची शिफ्ट कार नंबरचक १४घड ८१५८ असा एकूण ६,३४०००/रुपये किमतीचा मध्यमान मिळून आला आहे अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य अन्नसुरक्षा अधिकारी श्री जन्मवीर राजशेखर स्वामी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल कारवाई करण्यात आलेली आहे.

आदर्श कारवाई ही मा श्री अतुल कुलकर्णी. पोलीस अधीक्षक (भा.पो. से.) सोलापूर ग्रामीण.मा. प्रीतम कुमार यावलकर अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर, ग्रामीण मा. प्रशांत डगळे सो. सहाय्यक पोलीस अधीक्षक (भा.पो.से.) उपविभागीय पोलिस अधिकारी पंढरपूर उपविभाग, पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हमीद शेख,पो.हे.को.) गोविंद काम तकर, (पो.हे.का.) निलेश रोंगे, पो. हे.को. महेश कांबळे, पो.को. दिगंबर भंडारवाड, चार.पो.को/महेश गोडसे, पो.को./राहुल लोंढे,पो.को./शिवशंकर हुलजंती यांनी पार पडलेले आहे.



तरी पंढरपूर व परिसरासाठी नागरिकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की आपल्या परिसरामध्ये अवैध धंदे निदर्शनास येत असल्यास तात्काळ आमच्या कार्यालय संपर्क साधावा.

# संत जगनाडे महाराजांनी संत तुकाराम महाराजांचे विचार सर्वदूर पोहोचविले : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नागपूर : काही रुढीवादी लोकांनी संत तुकाराम महाराज यांच्या गाथा पाण्यात बुडविल्या, मात्र संत जगनाडे महाराज यांनीच त्या गाथा वाचवून तुकाराम महाराजांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

### शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण

कौशल्य विकास विभागांतर्गत रामदासपेठ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत जगनाडे महाराज यांचे नाव देण्यात आले, यावेळी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा होते. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, माजी खासदार रामदास तडस अतिथी म्हणून उपस्थित होते.

भक्ती संप्रदाय, वारकरी परंपरा ही महाराष्ट्राची ओळख असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारकरी संप्रदायाने उच्च-नीच भाव संपवून अवघा महाराष्ट्र एक केला. या मालिकेत संत जगनाडे महाराज यांचे कार्य अतिशय मोठे आहे. समाजातील मनुष्यता जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना महापुरुषांची नावे देण्याच्या उपक्रमाचीही मुखमंत्र्यांनी प्रशंसा केली.

मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रमस्थळी आगमन होताच औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. संस्थेच्या विद्यार्थिनींनी यावेळी लेझीम नृत्य सादर केले. संत जगनाडे महाराज यांच्या वेशभूषेत सर्वांचे सहभागी विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा सिमुरगव्हाण येथे संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : परम पूज्य जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा दिनांक ६ व ७ डिसेंबर २०२५ रोजी ज. न. म. संस्थान, उपपीठ मराठवाडा श्रीक्षेत्र माऊली माहेर सीमूर गव्हाण तालुका पाथरी जिल्हा परभणी येथे समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा उत्साहात पार पडला.सर्वप्रथम रामानंदाचार्यजींचे यजमानाच्या हस्ते शोडशोपचार पाद्यपूजन व सुवासिनींकडून औक्षण करण्यात आले. प. पू. रामानंदाचार्यजी यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, परब्रह्म हा निर्गुण आहे, त्याला जाणण्यासाठी ज्ञानचक्षू जागृत करावे लागते. अध्यात्मात उतरल्यावर बद्ध, मुमुक्षु, साधक आणि सिद्ध हे टप्पे कसे अनुभवास येतात हे त्यांनी साध्या शब्दांत समजावले. सिद्ध अवस्था मिळाल्यावर तत्व मसी, अहं ब्रह्मास्मि या वेदवचनाचा खरा बोध होतो, ते पुढे म्हणाले की मनुष्यजन्म हा अपार्थिव



संधी आहे. आपण का आलो, हा जन्म काय सांगतो हे शोधणं गरजेचं आहे. पशू जन्माला येतात आणि जगतात, पण मनुष्यजन्म कर्मयोनी असल्याने येथेच कर्म करून परमार्थ आणि उन्नती शक्य होते. तुकडोजी महाराजांच्या वचनांचा दाखला देत रामानंदाचार्यजी म्हणाले, संसारही सांभाळा आणि भक्तीही करा. संसार करून परमार्थ करावा ही संतांची शिकवण आजही तितकीच खरी आहे.

जगद्गुरू तुकोबारायांच्या अभंगाचा अर्थ सांगताना रामानंदाचार्यजी म्हणाले- जन्माचे जे मूळ पाहिले शोधून । दुःखाची कारण जन्म घ्यावा ।रजतम सत्व आहे ज्याच्या अंगी । याच गुणी जगी वाया गेला ।। या अभंगातून तुकोबारायांनी मनुष्यजन्माचा हेतू स्पष्ट केला आहे.

भाविकांच्या समस्या ऐकून रामानंदाचार्यजी म्हणाले की दुःख येणं नैसर्गिक आहे, पण अनियोजन ही मोठी समस्या आहे. आपण आयुष्यात नियोजन नाही करत, म्हणून त्रास वाढतो. मी तुम्हाला फक्त चॉकलेट देतो, समस्या तुम्हीच सोडवता-असं त्यांनी विनोदी शैलीत सांगितलं. समस्या निवारणासाठी रामानंदाचार्यजींनी सुचवले की दररोज दहा मिनिटे भक्ती करणे हा मनाचा व्यायाम आहे. मन शुद्ध झाल्यावरच भक्तीची खरी अनुभूती मिळते. नामदेवांच्या ओवीचा दाखला देत-

जैसे गंगा वाहे तैसे ज्याचे मन ।
भगवंत जाणं त्याच्या जवळी ।।

भक्तीमुळे एकाग्रता, संयम आणि योग्य नियोजन क्षमता वाढते, असे त्यांनी सांगितले.

भाविकांना मार्गदर्शन करताना रामानंदाचार्यजी म्हणाले की तुम्ही जगा आणि दुसऱ्याला जगवा, आणि रोज दहा मिनिटे भक्ती करण्याचे पथ्य पाळा. ते सेवा करताना कुणाची जात, धर्म, पद-प्रतिष्ठा पाहत नसल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

संस्थेमार्फत चालणाऱ्या समाजकार्याविषयी बोलताना त्यांनी सांगितले की राज्यभर ५२ म्बुलन्स सेवा कार्यरत असून आजवर लाखो लोकांना व्यसनमुक्ती मिळाली आहे. तसेच रक्तदान, वृक्षारोपण, लश्रेवळप पशशव, वेद पाठशाळा यांसारखे अनेक सेवा प्रकल्प सातत्याने राबवले जात आहेत.



दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमामुळे भाविकांच्या मनात भक्ती, अध्यात्म व योग्य जीवननियोजनाविषयी नवी ऊर्जा निर्माण झाली. रामानंदाचार्यजींच्या बोलीभाषेतील साध्या पण प्रभावी उपदेशामुळे भाविकांना त्यांच्या समस्यांकडे पाहण्याची नवी दिशा मिळाली.

सदर कार्यक्रमाला हदगाव हिमायतनगर मतदारसंघाचे आमदार मा.श्री. बाबुराव पाटील कोहळीकर साहेब, नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंडारकर परभणी जिल्हा परिषद सदस्य ड श्री दशरथ सरवदे हिंगोली पंचायत समिती सभापती श्री संजय नागरे, श्री नितीन चित्ते नगरसेवक संभाजीनगर, श्री व्यंकटराव पाटील गोजेगावकर जिल्हा परिषद, उमाकांत भोकरे नगरसेवक हदगाव, इत्यादी मान्यवरांनी यांनी रामानंदाचार्यजींचे शुभाशीर्वाद घेतले. सदर कार्यक्रमांमध्ये ७६२ भक्तगणांनी उपासक दीक्षा व ७१८ भक्तगणांनी साधक दीक्षा घेतली. परिसरातील अनेक ग्रामस्थ व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आशीर्वचनांचा लाभ घेतला. सदर कार्यक्रमांमध्ये १० ते १५ हजार भाविक भक्तगण उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पीठ समिति, जिल्हा समिती, तालुका समिती, सेवाकेंद्र समिती, महिला सेना, हिंदू संग्राम सेना, युवा सेना, आश्रम सेवा समिती यांनी प्रचंड मेहनत घेतली. अशी माहिती पीठ प्रमुख जयप्रकाश लोणारी, पीठ सहप्रमुख विजय देशपांडे, पीठ व्यवस्थापक सुरेश मोरे यांनी दिली.

# सुधाकर तेलंग यांना राज्य सेवा हक्क आयुक्त (पुणे) पदाची शपथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांनी सुधाकर बापूराव तेलंग यांना महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग आयुक्त, पुणे या पदाची शपथ दिली.



या कार्यक्रमास कोकण विभागाचे आयुक्त बलदेव सिंग, माजी आयुक्त दिलीप शिंदे, सचिव वैशाली चव्हाण, तसेच माजी जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर उपस्थित होते. निवृत्त वरिष्ठ अधिकारी उदय पाटील आणि भगवान गावडे यांनीही नवीन आयुक्तांचे अभिनंदन केले. माजी आयुक्त दिलीप शिंदे यांनी आयुक्त तेलंग यांचे स्वागत करत, आयोगाच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन केले.

मुख्य आयुक्त श्रीवास्तव म्हणाले की, सेवाकालावधीत जी लोकसेवा केली, त्याच कार्याची पुढील साखळी म्हणजे राज्य सेवा हक्क आयोग होय. या कामकाजात सर्व शासकीय विभाग आणि कर्मचाऱ्यांशी सातत्याने संबंध येत असतो. या जबाबदाऱ्या तेलंग अत्यंत दक्षता आणि कसोशीने पार पाडतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

संविधानातील मूल्यांची जपणूक करत नागरिकांना वेळेत व गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध राहीन, अशी ग्वाही तेलंग यांनी दिली. राज्य सेवा हक्क आयोग ही लोकसेवेची अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. नागरिकांचे प्रश्न मार्गी लावणे, सेवा वेळेत उपलब्ध करणे आणि शासकीय विभागांमध्ये जबाबदारी व पारदर्शकता वाढवणे प्राधान्य राहील. आगामी कार्यकाळात सर्वोत्तम काम करेल. असे तेलंग यांनी म्हटले.

राज्य सेवा हक्क आयोग नागरिकांना निर्धारित कालावधीत शासकीय सेवा उपलब्ध होत आहेत का याची देखरेख करते. तक्रारींची सुनावणी व विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते. शासकीय विभागांना सुधारणा सुचवणे व प्रक्रियेत पारदर्शकता राखणे तसेच सेवा हमी कायद्यांतर्गत लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी सहाय्य करते.

# व्यापार कृती समितीच्या विविध प्रश्नांबाबत पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडून आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महाराष्ट्र कृषी पणन (विकास व विनियमन) नियम १९६३ दुरुस्त्यांबाबत पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यापारी कृती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आढावा घेतला. राज्यातील मोठ्या बाजार समित्यांना 'राष्ट्रीय बाजार समित्या' म्हणून श्रेणीउन्नत करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालास आतंरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून दिली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांच्या विविध प्रश्नांबाबत मंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. यावेळी पणन महामंडळाचे संचालक संजय कदम, पणन सहसचिव विजयकुमार लहाने, सहसंचालक राजेंद्र तराळे यांच्यासह राज्यातील व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले की, तालुकास्तरावरील कृषी उत्पन्न बाजार समित्या ह्या शेतकऱ्यांचा शेतीमाल विक्री करण्याचे हक्काचे ठिकाण आहे. शेतकरी-व्यापारी-मापारी-हमाल या साखळीच्या माध्यमातून विक्री प्रक्रिया चालते. ही साखळी अशीच अबाधित राहण्यासाठी व्यापाऱ्यांनी बाजार समितीसोबत समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित शेतीमालास राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी विभागाव्दारे मुंबई येथे मोठे हब निर्माण करण्याचे नियोजन आहे. त्याच्या माध्यमातून रेल्वे, भूमार्ग व समुद्री मार्गाने उत्पादित मालास सर्वस्तरावर बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

व्यापारी संघटनांकडून प्राप्त सुचना व मागण्यांवर यावेळी बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. एपीएमसीत आलेल्या शेतीमालास बाजार समितीकडून युजर चार्जेस व सेस कर आकारु नये, ही प्रमुख मागणी व्यापारी संघटनांकडून मांडण्यात आली. त्यासंबंधी युजर चार्जेस व सेसमुळे अधिक प्रभावित होणाऱ्या घटकांसोबत पणन विभाग व व्यापारी संघटनेची बैठक घेण्यात येईल, यादृष्टीने एक अभ्यासपूर्ण अहवाल विभागास सादर करण्यात यावा, अशी सूचना यावेळी त्यांनी केली.

बाजार समित्यांकडून देण्यात येणाऱ्या अनुज्ञप्तीचे नूतनीकरणासाठी पारदर्शक प्रणालीचा अवलंब करण्यात यावा. जेणेकरुन व्यापारी वर्गाला सुटसुटीतपणे अनुज्ञप्तीचे वितरण होईल. एपीएमसी मध्ये कार्यरत कर्मचारी, मजूर आदींना शुध्द पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहासारख्या मूलभूत सुविधा उभारण्याबाबत यावेळी चर्चा झाली. राज्यातील व्यापारी संघटनांच्या पदाधिकारी व एपीएमसी प्रमुखांसोबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

## मनपा एन विभाग सहाय्यक आयुक्तांची भूमिका संशयास्पद ? : प्रशांत मुके

# शांती कन्स्ट्रक्शनने महानगरपालिका एन वॉर्ड ची फसवणूक करून निधी लाटला ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मनपा एन विभागातील प्रभाग क्रमांक १२३,१२४,१२७,१२८ या चारही प्रभागात मागील सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या कालावधीत शांती कंट्रक्शन यांनी एकूण ३९ कामे घेतली होती.परंतु यातील काही कामे ही प्रत्यक्षात त्या- त्या ठिकाणी पूर्ण झालेली नाहीत ? तसेच याबाबतचे संबंधित सर्व पुरावे आमच्याकडे उपलब्ध आहेत असे प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांचे म्हणणे आहे.स्थापत्य दुरुस्तीच्या नावाखाली फक्त कागदावर ही कामे दाखवून सदर कामांचा निधी शांती कंट्रक्शन या कंपनीने लाटला आहे ? तसेच या सर्व कामांचा एकूण निधी रु.७.३९.१२.१००/- इतका होत आहे.तसेच या सर्व प्रकरणात मनपा एन विभागातील परिरक्षण विभागातील संबंधित अधिकारी यांनी शांती कंट्रक्शन यांनी जागेवर त्याठिकाणी प्रत्यक्षात कामे पूर्ण केली आहेत की नाही ? यांची कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी निरीक्षण ही न करता निधी कसा काय वितरित केला ? तर हा मग भ्रष्टाचारच आहे ? तसेच याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे तसेच परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता सचिन खजुरे यांच्याकडे शांती कंट्रक्शन यांनी घेतलेल्या कामांची प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी निरीक्षण करण्याची मागणी केली असता त्यांच्याकडून ही यावर अद्याप ही कोणत्याही प्रकारची कार्यवाही होताना दिसत नसून,त्यामुळे शांती कंट्रक्शन या कंपनीला संबंधित मनपा एन विभाग परिरक्षण विभागातील अधिकारी सहकार्य करून शांती कंट्रक्शन या कंपनीला याठिकाणी पाठीशी घालत आहे हे दिसून येत आहे ? तसेच या सर्व प्रकरणाचा मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांनी लवकरात लवकर खुलासा करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी प्रहारचे प्रशांत मुके आणि प्रमोद खेडेकर यांनी एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली असता मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त हे या सर्व प्रकरणी कोणत्याही प्रकारची कारवाई करताना दिसत नसून सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसत आहे ? असे प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांचे म्हणणे असून यावर संबंधित एन विभाग प्रशासनाकडून कारवाई होत नसल्यास लवकरच आम्ही या सर्व भोंगळ कारभाराविरुद्ध आंदोलन उभे करून आवाज उठवू तसेच पुढ पर्यंत आम्ही हा विषय लावून धरून या सर्व प्रकरणी वरिष्ठ प्रशासनाला कारवाई करण्यास भाग पाडू असे प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांनी सांगितले.